राज्यातील नव्याने स्थापन करण्यात आलेल्या नगरपरिषदा/ नगरपंचायती या नागरी स्थानिक संस्थातील पदांच्या आकृतीबंधास मान्यता मिळण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : एमसीओ-२०१९/प्र.क्र.७४/नवि-१४
मुख्य इमारत, ४ था मजला,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ०३२
दि. १७ जून, २०१९.

संदर्भ:-१.नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१५/प्र.क्र.१३९/नवि-१४, दि.०५.०७.२०१६.
२.नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१६/प्र.क्र.३०१/भाग-१/नवि-१४, दि.२२.०९.२०१७.
३. नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१८/प्र.क्र. १३९/नवि-१४, दि.१२.०२.२०१८.

प्रस्तावना :-

राज्यातील तालुका मुख्यालयांच्या ठिकाणी व अन्य ठिकाणी नव्याने स्थापन करण्यात आलेल्या १०१ नगरपरिषदा/नगरपंचायतींचा व आकृतीबंध/पदनिर्मितीचा व त्यासाठीच्या वार्षिक आवर्ती सहायक अनुदानाचा प्रस्ताव शासन निर्णय दि.०५.०७.२०१६ अन्वये मंजुर करण्यात आला आहे. तसेच, नव्याने निर्माण करण्यात आलेली पदे भरण्यासाठी निकष विहीत केले आहेत.

त्याचप्रमाणे, दि.०५.०७.२०१६ च्या शासन निर्णयामध्ये परिच्छेद क्र.७ मध्ये, यापुढे, नव्याने निर्माण होणाऱ्या नगरपरिषदा/ नगरपंचायती यांच्याकरीता उपरोक्त निकषानुसार आकृतीबंध निश्चित करण्यास व अनुषंगाने पदे निर्माण करण्यास मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून, आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी उपरोक्त निकषानुसार यापुढे नव्याने निर्माण होणाऱ्या नगरपरिषदा/ नगरपंचायती यांच्याकरीताचा प्रस्ताव शासनास सादर करावा असे स्पष्ट करण्यात आले आहे.

दि.०५.०७.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार,संदर्भीय क्र. २ येथील दि.२२.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये २७ नवनिर्मित नगरपरिषदा/ नगरपंचायतींसाठी व आकृतीबंध/पदनिर्मिती व त्यासाठीचे वार्षिक आवर्ती सहायक अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

तसेच, महाराष्ट्र नगरपरिषद संवर्गातील पदांसाठी नगरपरिषद/ नगरपंचायतनिहाय प्रमाणनिश्चिती व सुधारित आकृतीबंध संदर्भीय क्र. ३ येथील दि.१२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आला आहे.

उपरोक्त दि.०५.०७.२०१६ व दि.१२.०२.२०१८ च्या शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने, राज्यातील नवनिर्मित ७ नगरपरिषदा/ नगरपंचायतींचा आकृतीबंध निश्चित करणे व अनुषंगाने पदनिर्मिती करण्याबाबतचा व सदर पदांच्या वार्षिक आवर्ती सहायक अनुदान मंजूरीबाबतचा प्रस्ताव आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी शासनास सादर केला आहे. तसेच, प्रत्येक नगरपरिषद/ नगरपंचायती यांच्याकरीता अधिनियमातील तरतूदीनुसार मुख्याधिकारीचे १ पद निर्माण करणे आवश्यक आहे. त्यानुसार, नवनिर्मित ७ नगरपरिषद/ नगरपंचायतीपैकी २ नगरपरिषद/ नगरपंचायती तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नसल्याने, त्याकरिता मुख्याधिकारी गट-ब संवर्गातील २ पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी सादर केला आहे. त्या अनुषंगाने, ७ नवनिर्मित नगरपरिषदा/ नगरपंचायतीसाठी दि.०५.०७.२०१६ व दि.१२.०२.२०१८ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आवश्यक आकृतीबंध निश्चिती व वार्षिक आवर्ती सहायक अनुदान मंजूरी तसेच, सफाई कामगारांच्या पदांसाठी वार्षिक आवर्ती सहायक अनुदान मंजूरी व मुख्याधिकारी गट-ब संवर्गातील २ पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

नगर विकास विभागाच्या दि.०५.०७.२०१६ व दि.१२.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार खाली नमूद एकुण ७ नगरपरिषदा/ नगरपंचायतीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणानुसार एकुण २२६ पदांचा आकृतीबंध निश्चित करण्यात येत असून, त्यासाठीचा रु.६,५२,१८,३६१/- वार्षिक आवर्ती खर्च पुढीलप्रमाणे आहे.

लोकसंख्या	नगरपरिषदा/नगरपंचायतींचे नाव	प्रस्तावित पदांची संख्या	एकुण वार्षिक आवर्ती सहायक अनुदान रू.
१०००१ ते २५००० (एकुण-५)	१. चंदगड नगरपंचायत, जि.कोल्हापूर २. आजरा नगरपंचायत, जि.कोल्हापूर ३. मुक्ताईनगर नगरपंचायत, जि.जळगांव ४. वडगांव नगरपंचायत, जि.पुणे ५. शेंदुर्णी नगरपंचायत, जि.जळगांव	१४०	४,००,७८,१४५/-
२५००० पेक्षा जास्त (एकुण-२)	१. शिरोळ नगरपरिषद, जि.कोल्हापूर २. बुटीबोरी नगरपरिषद, जि.नागपूर	८६	२,५१,४०,२१६/-
एकुण - ७		**२२६**	**६,५२,१८,३६१/-**

२. वरील तक्त्यातील नमूद ७ नगरपरिषदा/ नगरपंचायतींसाठी दि.०५.०७.२०१६ व दि.१२.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार लोकसंख्यानिहाय नवनिर्मित एकुण ७ नगरपरिषदा/ नगरपंचायतीसाठी सोबतच्या **सहपत्र-क व ड** मधील २२६ पदांच्या आकृतीबंधास व त्यासाठीच्या वार्षिक आवर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार, **एकुण रु.६,५२,१८,३६१/-** एवढे वार्षिक आवर्ती सहायक अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

३. तसेच, सदर ७ नवनिर्मित नगरपरिषदा/ नगरपंचायतींची लोकसंख्या १,४६,०७५ इतकी असून, दर १००० लोकसंख्येमागे १ सफाई कामगाराचे पद निर्माण करणे आवश्यक आहे. यास्तव, सदर लोकसंख्येनुसार १४६ सफाई कामगारांच्या काल्पनिक पदांच्या वेतनापोटी रु.२,६३,९२,१२८/- इतके वार्षिक आवर्ती सहायक अनुदान अनुज्ञेय होईल. तथापि, प्रथम टप्प्यात १४६ काल्पनिक पदांऐवजी ७३ एवढ्या सफाई कामगारांच्या काल्पनिक पदांच्या वेतनाएवढे म्हणजेच **रु.१,३१,९६,०६४/-** एवढे वार्षिक आवर्ती सहायक अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

४. तसेच, सदर ७ नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील शेंदुर्णी नगरपंचायत, जि.जळगांव व बुटीबोरी नगरपरिषद, जि.नागपूर या नगरपरिषदा/ नगरपंचायती तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नसल्याने, सदर नगरपरिषद/ नगरपंचायतींचे मुख्याधिकारी पदे मंजूर करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे, सदर दोन्ही नगरपरिषद/ नगरपंचायतींकरिता मुख्याधिकारी गट-ब या संवर्गातील रु.९३००-३४८०० ग्रेड पे-४४०० या वेतनश्रेणीतील २ पदे निर्माण करण्यात येत आहेत. त्याकरीता **रु.९,४२,१४४/-** एवढे वार्षिक आवर्ती सहायक अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

५. उपरोक्तप्रमाणे, निर्माण करण्यात आलेली पदे दि.०५.०७.२०१६ च्या शासन निर्णयातील विहित कार्यपद्धती अवलंबून भरण्याबाबतची कार्यवाही करुन, त्याबाबतच्या करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा अहवाल यासंदर्भात दि.०५.०७.२०१६ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या समितीकडून दर पंधरवड्यास शासनास सादर करावा.

६. उपरोक्त पदावरील खर्च मागणी क्र.मुख्य लेखाशीर्ष एफ-२, “१९२, नगरपरिषदांना सहाय्य” (००)(६०) जकात कर व महागाई भत्ता रद्द केल्यामुळे नगरपरिषदांना सहायक अनुदान (२२१७८०६६) या खाली टाकून सन २०१९-२० च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१७१५००१६३२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay S Gokhale

Digitally signed by Sanjay S Gokhale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b662808245be49a8459ed4c63961ebdc3cb961, cn=Sanjay S Gokhale
Date: 2019.06.17 15:25:04 +05'30'

सोबत:-सहपत्र- क व ड .

(सं.श.गोखले)
शासनाचे सह सचिव

प्रत :-

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव
२. मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
३. मा.मंत्री, वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव.
४. मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव.
५. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्य.
६. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव
७. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
८. मा.राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय.
९. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
१०. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
११. मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी.
१२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
१३. सर्व संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक.
१४. सर्व संबंधित जिल्हाधिकारी.
१५. सर्व संबंधित नगरपरिषदा/नगरपंचायती यांचे मुख्याधिकारी.
१६. वित्त विभाग (कार्या.वित्तिय सुधारणा-१/व्यय-३), मंत्रालय, मुंबई.
१७. नगर विकास विभागातील सर्व कार्यासने.
१८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१९. महालेखापाल (ले. प अ.)/(ले.प.), १ व २, मुंबई/ नागपूर.
२०. महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे.
२१. निवडनस्ती (नवि-१४)

नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.एमसीओ -२०१९/ प्र.क्र.७४/ नवि-१४, दि. १७ जून,२०१९ सोबतचे

सहपत्र-क

१०,००१ ते २५००० लोकसंख्या असलेल्या ०५ नगरपंचायतींकरीता मंजूर करावयाच्या पदांचा तपशील.

(अ) राज्यस्तरीय संवर्गातील पदांव्यतिरिक्त पदे.

अ.क्र.	पदाचे नाव	वेतन श्रेणी	पदसंख्या (१ न.पं.)	पदसंख्या (५ न.पं.)	वार्षिक खर्च (१ न.पं.)	वार्षिक खर्च (५ न.पं.)
१.	लिपिक टंकलेखक	५२००-२०२००(ग्रेड पे १९००)	७	३५	१६,८६,६३६	८४,३३,१८०
२.	स्वच्छता निरिक्षक	५२००-२०२००(ग्रेड पे २४००)	२	१०	६,१३,७५२	३०,६८,७६०
३.	गाळणी चालक/ प्रयोगशाळा सहायक	५२००-२०२००(ग्रेड पे २०००)	१	५	२,६३,०२८	१३,१५,१४०
४.	पंप ऑपरेटर/ विजतंत्र/ जोडारी	५२००-२०२०० (ग्रेड पे १९००)	३	१५	७,२२,८४४	३६,१४,२२०
५.	तारतंत्री/ वायरमन	५२००-२०२००(ग्रेड पे १९००)	१	५	२,४०,९४८	१२,०४,७४०
६.	शिपाई	४४४०-७४४० (ग्रेड पे १३००)	३	१५	५,४२,३०४	२७,११,५२०
७.	मुकादम	४४४०-७४४०(ग्रेड पे १६००)	२	१०	४,०३,८७३	२०,१९,३६५
८.	व्हाल्वमन	४४४०-७४४०(ग्रेड पे १३००)	१	५	१,८०,७६८	९,०३,८४०
		एकुण	**२०**	**१००**	**४६,५४,१५३**	**२,३२,७०,७६५**

१०००१ ते २४,९९९ लोकसंख्या असलेल्या नव्याने स्थापन नगरपंचायतीसाठी महाराष्ट्र नगरपरिषद संवर्ग सेवांतर्गत पदांचा सुधारित आकृतीबंध.

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्ग सेवा नगरपरिषद व नगरपंचायत निहाय प्रस्तावित पदसंख्या						
आकृतीबंध प्रकार क्र.	७	१०००१ ते २४,९९९ पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या नव्याने स्थापन नगरपंचायतीसाठी				
नगरपरिषद/ नगरपंचायती संख्या	५	नगरपरिषद/ नगरपंचायत निहाय पदसंख्या				८
संवर्ग सेवा नाव		श्रेणी-अ ९३००-३४८०० ग्रेड वेतन-४४००	श्रेणी-ब ९३००-३४८०० ग्रेड वेतन-४३००	श्रेणी-क ९३००-३४८०० ग्रेड वेतन-४२००	श्रेणी-क ५२००-२०२०० ग्रेड वेतन-२८००	सेवा निहाय एकुण पद संख्या
महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा	अ.स्थापत्य	०	१	०	०	१
	ब.विद्युत	०	०	०	०	०
	क.संगणक	०	०	०	०	०
महाराष्ट्र नगरपरिषद जलदाय, मलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा		०	०	१	०	१
महाराष्ट्र नगरपरिषद लेखापाल व लेखापरिक्षक		०	०	२	०	२
महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारक व प्रशासकीय सेवा		०	२	०	१	३
महाराष्ट्र नगरपरिषद अग्निशमन सेवा		०	०	०	०	०
महाराष्ट्र नगरपरिषद नगररचनाकार आणि विकास सेवा		०	०	१	०	१
श्रेणी निहाय एकुण पदसंख्या		**०**	**३**	**४**	**१**	**८**

१०००० ते २४,९९९ लोकसंख्या असलेल्या नगरपंचायतींची यादी

अ.क्र.	विभाग	जिल्हा	नगरपंचायत
१.	पुणे	कोल्हापूर	चंदगड नगरपंचायत
२.	पुणे	कोल्हापूर	आजरा नगरपंचायत
३.	पुणे	पुणे	वडगांव नगरपंचायत
४.	नाशिक	जळगांव	मुक्ताईनगर नगरपंचायत
५.	नाशिक	जळगांव	शेंदुर्णी नगरपंचायत

नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.एमसीओ -२०१९/ प्र.क्र.७४/ नवि-१४, दि. १७ जून,२०१९ सोबतचे

सहपत्र-ड

२५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ०२ नगरपरिषदांकरीता मंजूर करावयाच्या पदांचा तपशील.

(अ) राज्यस्तरीय संवर्गातील पदांव्यतिरिक्त पदे

अ.क्र.	पदाचे नाव	वेतन श्रेणी	पदसंख्या (१ न.पं.)	पदसंख्या (२ न.पं.)	वार्षिक खर्च (१ न.पं.)	वार्षिक खर्च (२ न.पं.)
१.	लिपिक टंकलेखक	५२००-२०२०० (ग्रेड पे १९००)	१०	२०	२४,०९,४८०	४८,१८,९६०
२.	स्वच्छता निरिक्षक	५२००-२०२०० (ग्रेड पे २४००)	३	६	९,२०,६२८	१८,४१,२५६
३.	गाळणी चालक/ प्रयोगशाळा सहायक	५२००-२०२०० (ग्रेड पे २०००)	१	२	२,६३,०२८	५,२६,०५६
४.	पंप ऑपरेटर/ विजतंत्र/ जोडारी	५२००-२०२०० (ग्रेड पे १९००)	३	६	७,२२,८४४	१४,४५,६८८
५.	तारतंत्री/ वायरमन	५२००-२०२०० (ग्रेड पे १९००)	३	६	७,२२,८४४	१४,४५,६८८
६.	शिपाई	४४४०-७४४० (ग्रेड पे १३००)	३	६	५,४२,३०४	१०,८४,६०८
७.	मुकादम	४४४०-७४४० (ग्रेड पे १६००)	४	८	८,०७,७४४	१६,१५,४८८
८.	व्हाल्वमन	४४४०-७४४० (ग्रेड पे १३००)	१	२	१,८०,७६८	३,६१,५३६
एकुण			**२८**	**५६**	**६५,६९,६४०**	**१,३१,३९,२८०**

२५००० ते ३९,९९९ लोकसंख्या असलेल्या "क" वर्ग नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी महाराष्ट्र नगरपरिषद संवर्ग सेवांतर्गत पदांचा सुधारीत आकृतीबंध.

महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्ग सेवा नगरपरिषद व नगरपंचायत निहाय प्रस्तावित पदसंख्या						
आकृतीबंध प्रकार क्र.	५	२५००० ते ३९,९९९ लोकसंख्या असलेल्या "क" वर्ग नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी				
नगरपरिषद/ नगरपंचायती संख्या	२	नगरपरिषद/ नगरपंचायती निहाय पदसंख्या				१५
संवर्ग सेवा नाव		श्रेणी-अ ९३००-३४८०० ग्रेड वेतन-४४००	श्रेणी-ब ९३००-३४८०० ग्रेड वेतन-४३००	श्रेणी-क ९३००-३४८०० ग्रेड वेतन-४२००	श्रेणी-क ५२००-२०२०० ग्रेड वेतन-२८००	सेवा निहाय एकुण पद संख्या
महाराष्ट्र नगरपरिषद अभियांत्रिकी सेवा	अ.स्थापत्य	०	१	१	०	२
	ब.विद्युत	०	०	१	०	१
	क.संगणक	०	०	१	०	१
महाराष्ट्र नगरपरिषद जलदाय, मलनिस्सारण व स्वच्छता अभियांत्रिकी सेवा		०	०	१	०	१
महाराष्ट्र नगरपरिषद लेखापाल व लेखापरिक्षक		०	०	२	०	२
महाराष्ट्र नगरपरिषद कर निर्धारक व प्रशासकीय सेवा		०	२	०	४	६
महाराष्ट्र नगरपरिषद अग्निशमन सेवा		०	०	०	१	१
महाराष्ट्र नगरपरिषद नगररचनाकार आणि विकास सेवा		०	०	१	०	१
श्रेणी निहाय एकुण पदसंख्या		**०**	**३**	**७**	**५**	**१५**

२५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या नगरपंचायतींची यादी.

अ.क्र.	विभाग	जिल्हा	नगरपरिषद
१.	पुणे	कोल्हापूर	शिरोळ नगरपरिषद
२.	नागपूर	नागपूर	बुटीबोरी नगरपरिषद